नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - ३१३ | Issue - 313 | वार शनिवार दि. ४ एप्रिल २०२६ | Blow- Saturday Date 4 April 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com


# 'दिल्ली-एनसीआर'सह उत्तर भारतात ५.९ तीव्रतेचा भूकंप

## भूकंपाचे केंद्र अफगाणिस्तान - तजाकिस्तान सीमेवर; भूकंपामुळे कोणतीही जीवितहानी नाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दिल्ली-एनसीआर आणि संपूर्ण उत्तर भारतात शुक्रवारी (३ एप्रिल) रात्री ९:४२ वाजता भूकंपाचे जोरदार झटके जाणवले. दिल्ली-एनसीआर, चंदीगड, हिमाचल प्रदेशसह उत्तर भारतातील अनेक भागात हे झटके जाणवले. यासोबतच जम्मू-कश्मीरच्या अनेक भागांमध्येही जमीन हलल्यामुळे लोक घराबाहेर पडले. रिश्टर स्केलवर या भूकंपाची तीव्रवास ५.९ इतकी मोजण्यात आली असून भूकंपाचे केंद्र अफगाणिस्तान-तजाकिस्तान सीमेवर असल्याचे सांगण्यात आले आहे.

दिल्ली-एनसीआर मधील अनेक उंच इमारतींमध्ये राहणाऱ्यांना या भूकंपाचे झटके स्पष्ट जाणवले. ऑफिस आणि घरी बसलेले लोक लगेच बाहेर पडले. काही ठिकाणी लोक पार्क आणि मोकळ्या मैदानात एकत्र झाले. जम्मू-काश्मीरच्या उधमपूर, पुंछ आणि काश्मीर खोऱ्यातील अनेक भागातही भूकंपाचे झटके जाणवले. हे झटके काही सेकंदांसाठी जाणवले. पाकिस्तानमधील इस्लामाबाद, पंजाब आणि पेशावरसह अनेक भागातही जोरदार झटके जाणवले. या भूकंपामुळे सध्या कोणतीही मोठी हानी किंवा जीवितहानी झाल्याची माहिती नाही, परंतु प्रशासन परिस्थितीवर लक्ष ठेवले आहे. प्रशासनाने लोकांना न



घाबरण्याचे आवाहन केले. तसेच अफवांपासून सावध राहण्याचा इशारा दिला. भूकंपाच्या झटक्यांनंतर लोक सोशल मीडियावर आपले अनुभव शेअर करताना दिसले. अनेक लोकांनी सांगितले की त्यांना अचानक पंखे आणि फर्निचर हलताना जाणवले. सध्या प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापनाच्या टीम्स परिस्थितीवर लक्ष ठेवत आहेत आणि गरज भासल्यास तत्काळ कारवाईस तयार आहेत.

भूकंपासंदर्भातील शास्त्रीय माहितीनुसार पृथ्वीच्या आत ७ टेक्टॉनिक प्लेट्स आहेत. या प्लेट्स सतत फिरत असतात. जेव्हा या प्लेट्स एकमेकांशी धडकतात, रगडतात, एकमेकांच्या वर चढतात किंवा त्यापासून दूर जातात, तेव्हा जमीन हलते. यालाच भूकंप म्हणतात. भूकंपाची तीव्रता मोजण्यासाठी रिक्टर स्केलचा उपयोग केला जातो, ज्याला रिक्टर मॅग्निच्यूड स्केल म्हणतात.रिक्टर मॅग्निच्यूड स्केल १ ते ९ पर्यंत असते. भूकंपाची तीव्रता त्याच्या केंद्रस्थानी (एपिसेंटर) पासून मोजली जाते. म्हणजे त्या केंद्रातून निघणारी ऊर्जा या स्केलवर मोजली जाते. १ म्हणजे कमी तीव्रतेची ऊर्जा आणि ९ म्हणजे सर्वाधिक, अत्यंत भयंकर आणि विध्वंसक लहरी. ही लहरी दूर जाऊन हळूहळू कमजोर होतात. जर रिक्टर स्केलवर तीव्रता ७ दिसते, तर त्याच्या आजूबाजूच्या ४० किलोमीटरच्या क्षेत्रात जोराचा झटका जाणवतो.

# संरक्षणमंत्र्यांच्या हस्ते विशाखापट्टणममध्ये अणुऊर्जेवर चालणाऱ्या पाणबुडीचे आणि स्टेल्थ फ्रिगेटचे जलावतरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

विशाखापट्टणम : संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते आज (शुक्रवार ३ एप्रिल २०२६) विशाखापट्टणममध्ये अणुऊर्जेवर चालणाऱ्या आयएनएस अरिदमन पाणबुडीचे आणि आयएनएस तारागिरी स्टेल्थ फ्रिगेटचे जलावतरण होणार आहे. या पार्श्वभूमीवर सकाळीच संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी हिंदीत एक एक्स पोस्ट (द झ्र्ीीं ी ढ्ढशर्शी) केली आहे. 'शब्द नहीं शक्ति है अरिदमन' अशा स्वरुपाची सूचक पोस्ट संरक्षणमंत्र्यांनी केली आहे. अरिदमन हा केवळ एक शब्द नाही, ती शक्ती आहे, असे संरक्षणमंत्र्यांनी सांगितले.

एल अँड टीने विशाखापट्टणम येथील गुप्त जहाजबांधणी केंद्रात अणुऊर्जेवर चालणाऱ्या आयएनएस अरिदमन पाणबुडीची निर्मिती केली आहे. मागील अनेक महिन्यांपासून समुद्रात या पाणबुडीच्या चाचण्या सुरू होत्या. नौदलात सहभागी झाल्यावर ही पाणबुडी स्ट्रॅटेजिक फोर्सेस कमांड अंतर्गत कार्यरत राहणार आहे. स्ट्रॅटेजिक फोर्सेस कमांड अंतर्गत २०१६ पासून आयएनएस अरिहंत आणि २०२४ पासून आयएनएस अरिघात कार्यरत आहे. आता स्ट्रॅटेजिक फोर्सेस कमांड अंतर्गत आजपासून आयएनएस अरिदमन ही तिसरी पाणबुडीही कार्यरत होणार आहे. विशेष म्हणजे या तिन्ही पाणबुड्या अणुऊर्जेवर चालत असल्यामुळे दीर्घकाळ खोल समुद्रात लपून शत्रूच्या हालचालींचा वेध घेणे आणि योग्य वेळी घातक प्रहार करणे यासाठी सक्षम आहेत.




अणुऊर्जेवर चालणारी आयएनएस अरिदमन ही सात हजार टन वजनाची पाणबुडी आहे. आयएनएस अरिहंत आणि आयएनएस अरिघात या सहा हजार टन वजनाच्या पाणबुड्या होत्या. या दोन्ही पाणबुड्यांपेक्षा आयएनएस अरिदमन महाकाय आणि शक्तिशाली आहे. पूर्वीच्या पाणबुड्यांवरील चारच्या तुलनेत, या पाणबुडीमध्ये आठ व्हर्टिकल लॉन्च सिस्टीम (तङ्ड) ट्यूब आहेत, ज्यामुळे ती चोवीस के-१५ सागरिका ही कमी पल्ल्याची क्षेपणास्त्रे (७५० किमी) आणि आठ के-४ मध्यम पल्ल्याची क्षेपणास्त्रे (३५०० किमी) तैनात करू शकते. तसेच, ती सहा हजार किमी पल्ल्याची के-५ क्षेपणास्त्रे देखील पाणबुडीत सामावून घेऊ शकते.

तब्बल ८३ मेगावॅट क्षमतेच्या कॉम्पॅक्ट लाईट वॉटर रिॲक्टरवर चालणारी ही पाणबुडी तिच्या रचनेमुळे रडारला चकवू शकते. कमीत कमी आवाज करत ही पाणबुडी दीर्घकाळ प्रभावीरित्या कार्यरत राहू शकते. या पाणबुडीत सात पात्यांचा प्रोपेलर आहे, ज्यामुळे पृष्ठभागावर १२-१५ नॉट्स (सागरी मैल) आणि पाण्याखाली २४ नॉट्सचा (सागरी मैल) वेग मिळतो. प्रगत स्वदेशी सोनार प्रणाली उशूस (णडक्रड) आणि पंचेंद्रिय, तसेच ॲनेकोइक टाइल्समुळे या पाणबुडीची गुप्तता आणि शोध क्षमता वाढते.

संरक्षणमंत्र्यांच्या हस्ते आज आयएनएस तारागिरी स्टेल्थ फ्रिगेटचेही जलावतरण होणार आहे. याप्रसंगी गोदीचे (डॉकमधील) वरिष्ठ अधिकारी तसेच अनेक नौदल अधिकारी उपस्थित असतील.

प्रोजेक्ट १७ ए अंतर्गत विकसित करण्यात आलेली तारागिरी ही चौथी स्टेल्थ फ्रिगेट आहे. ही मुंबईच्या माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेडने बांधलेली ६,६७० टन वजनाची युद्धनौका आहे. तिच्या रचनेमुळे ती रडारला चकवू शकते. या क्षमतेमुळे दीर्घकाळ ही फ्रिगेट समुद्रातील कठीण परिस्थितीतही सुरक्षित राहू शकते. ही नौका ७५ टक्क्यांहून अधिक स्वदेशी सामग्रीने बांधली आहे. आधुनिक शस्त्रांनी सुसज्ज असलेल्या या फ्रिगेटमध्ये सुपरसॉनिक क्षेपणास्त्र आहेत. समुद्रातून समुद्रात तसेच समुद्रातून आकाशात आणि समुद्रातून जमिनीवर हल्ला करण्याची क्षमता या फ्रिगेटमध्ये आहे.

# कर्जबाजारी युवकाने ७५ वर्षीय आजीला ठार करुन सोने केले लंपास

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : जिल्ह्यातील बार्शी तालुक्यात ४ वर्षांपूर्वी मोठा शेअर मार्केट घोटाळा उघडकीस आला होता. विशाल फटे नावाच्या तरुणाने शेअर मार्केटच्या नावाखाली बार्शीकरांना कोट्यवधि रुपयांचा गंडा घातला होता. याप्रकरणी, अद्यापही आरोपी फटे तुरुंगात असून त्याच्या जाळ्यात अडकलेले आर्थिक नुकसानीतून पुढे आले नाहीत. मात्र, तरीही बार्शीत शेअर मार्केटमधून जास्त पैसा कमावण्याच्या नादात स्वत:ला कर्जबाजारी करत आहे. तर, याच कर्जातून मुक्त होण्यासाठी एका तरुणाने चक्क ७३ वर्षीय वृद्ध महिलेला स्वत:च्या घरी बोलवून धारधार शस्त्राने खून केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. गेल्या काही दिवसांपासून बेपत्ता असलेल्या गंगुबाई गडदे यांचा शोध लागला, पण अंगावर शहारे आणणारा थरारक शेवट झाल्याची माहिती पोलीस तपासातून पुढे आली आहे.

शशिकांत किसन वायकुळे (वय ६४, रा. उपळाई रोड, बार्शी) यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, संशयित आरोपी चांगदेव पाटील याच्यावर भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१), २३८ प्रमाणे खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीच्या माहितीनुसार, त्यांची चुलत बहीण गंगुबाई कालीदास गडदे (वय ७३, रा. हांडे गल्ली, कचेरी रोड, बार्शी) या एकट्याच राहत होत्या. त्यांच्या घरातील भाडेकरुंमधून मिळणाऱ्या उत्पन्नावर त्यांचा उदरनिर्वाह चालत होता. मात्र, २५ मार्च २०२६ रोजी गंगुबाई आपल्या घराला कुलूप लावून कोणालाही न सांगता निघून गेल्याचे समोर आले. त्यानंतर त्यांच्याशी संपर्क होत नसल्याने कुटुंबीयांनी २७ मार्च रोजी बार्शी शहर पोलीस ठाण्यात मिसिंग तक्रार (क्र. ४२/२०२६) दाखल केली होती. तपासादरम्यान, स्थानिक सीसीटीव्ही फुटेजमध्ये गंगुबाई या संशयित चांगदेव गोवर्धन पाटील (रा. हत्तीज, ता. बार्शी; सध्या पवार बिल्डिंग, शिवाजीनगर) यांच्यासह इमारतीत जाताना दिसून आल्या. मात्र, त्या परत बाहेर येताना दिसल्या नाहीत. विशेष म्हणजे परिसरातील संबंधित सीसीटीव्ही फुटेजही डिलिट झाल्याचे आढळून आले.

**लिंबू सरबतातून झोपेच्या गोळ्या दिल्या**

बार्शी शहर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक उमाकांत कुंजीर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हा प्रगटीकरण पथकातील पोलीस हवालदार अमोल माने, प्रवीण साठे, सचिन देशमुख, राहुल उदार, अंकुश जाधव, बाळकृष्ण मुठाळ, अविनाश पवार, उघडे हे बेपत्ता महिलेचा शोध घेत होते. पोलिसांनी संशयिताचा शोध घेत असताना अखेर त्याला २ एप्रिल रोजी पोलिसांनी ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने गुन्ह्याची कबुली दिल्याचे समोर आले आहे. संशयित चांगदेव पाटील याने शेअर मार्केटमधील आर्थिक नुकसानीमुळे पैशांची गरज असल्याने गंगुबाई यांच्या अंगावरील सोन्याचे दागिने काढून घेण्यासाठी वृद्ध आजीच्या हत्येचा बनाव रचला. त्यानुसार, २५ मार्च रोजी त्याने गंगुबाई यांना आपल्या घरी बोलावून लिंबू सरबतातून झोपेच्या गोळ्या दिल्या. त्या बेशुद्ध झाल्यानंतर टॉवेलने नाक दाबून त्यांचा खून केला. त्यानंतर मृतदेह एका काळपट रंगाच्या पिशवीत भरून आपल्या कार (हुंदाई वेरना, क्रमांक चक-२० उड ८९३७) मधून नेऊन पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने विल्हेवाट लावल्याचा प्रयत्न केला.

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने आढावा बैठक संपन्न

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती त्यांच्या विचारांचा उत्सव म्हणून साजरी करूया : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या विचारांनी आणि संविधानाने देशाला प्रगतीची दिशा मिळाली आहे. त्यांचे कार्य आणि त्यांनी समाजाच्या उन्नतीसाठी दिलेले योगदान समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवणे हे अत्यंत आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त होणारा कार्यक्रम दरवर्षी अधिक उत्कृष्ट करण्याचा प्रयत्न राज्य शासन करत असून, यावर्षीही विविध विभागांच्या समन्वयातून तो अधिक भव्य स्वरूपात साजरा करण्यात येईल. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचा सोहळा त्यांच्या विचारांचा उत्सव म्हणून साजरा करूया, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १४ एप्रिल, २०२६ रोजीच्या १३५ व्या जयंतीच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे आढावा बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते.

या बैठकीस बैठकीस सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, माजी राज्यमंत्री भाई गिरकर, माजी आमदार प्रकाश गजभिये, मुंबई महापालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे, अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव गोविंदराज, कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल, मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन भारती, प्रधान सचिव श्रीकर परदेशी, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, भन्ते डॉ. राहूल बोधी महाथेरो, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाणदिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे, दादर चैत्यभूमी स्मारक समितीचे प्रतिनिधी यांच्यासह विविध विभागाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महापुरुषांच्या जयंती साजरी करण्यामागील उद्देश केवळ औपचारिकता नसून त्यांच्या विचारांची आणि कार्याची प्रेरणा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविणे असा आहे. डॉ. आंबेडकरांनी दिलेले संविधान हे जगातील सर्वोत्तम संविधानांपैकी एक असून, त्यातील समावेशकतेच्या तत्त्वामुळे भारत विकसित राष्ट्राकडे वाटचाल करत आहे. समाजाला मिळणाऱ्या संधी, हक्क आणि प्रगती यामागे कोणाचे योगदान आहे, हे नव्या पिढीला समजणे आवश्यक आहे. त्यामुळे जयंती सोहळा हा केवळ उत्सव न राहता विचारांचा प्रसार करणारा पर्व ठरतो.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या दि.१४ एप्रिल २०२६ रोजी होणाऱ्या जयंती उत्सवासाठी देशभरातून लाखो नागरिक चैत्यभूमीवर येतात. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर चैत्यभूमी परिसरात अभिवादनासाठी येणाऱ्या अनुयायी आणि नागरिकांसाठी आवश्यक सोयीसुविधांची सर्वंकष व्यवस्था करण्यात यावी. उष्णतेपासून संरक्षण मिळावे यासाठी ठिकठिकाणी मंडप उभारण्यात यावेत. प्रामुख्याने पिण्याच्या पाण्याची व्यवस्था उपलब्ध ठेवावी. तसेच, दादर आणि परिसरातील वाहतूक सुरळीत राहावी यासाठी वाहतूक पोलिसांनी योग्य नियोजन करून नियंत्रण ठेवावे, असे निर्देशही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी संबधित अधिकाऱ्यांना दिले.

नागरिकांना मार्गदर्शन होण्यासाठी विविध ठिकाणी सूचना फलक लावावेत. बेस्ट प्रशासनाने दादर रेल्वे स्थानक ते चैत्यभूमी दरम्यान पुरेशा प्रमाणात बससेवा उपलब्ध करून द्यावी, जेणेकरून नागरिकांची ये-जा अधिक सुलभ होईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती देशासह जगभर मोठ्या प्रमाणावर साजरी होत असल्याचा उल्लेख करत, हा सोहळा अधिक उत्तम पद्धतीने साजरा करण्याची जबाबदारी आपली असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

मंत्री संजय शिरसाट म्हणाले,भारतीय संविधान प्रत्येक घरापर्यंत पोहोचवण्याचा उपक्रम विभागामार्फत हाती घेण्यात आला असून, जिल्हाधिकारी कार्यालयांच्या माध्यमातून त्याची अंमलबजावणी सुरू आहे. नागरिकांमध्ये संविधानाबाबत जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. डॉ. बाबसाहेब आंबेडकरांचा शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा संदेश लक्षात घेऊन विद्यार्थ्यांसाठी मोठ्या प्रमाणावर वसतिगृहांची उभारणी करण्यात येत आहे. जयंती सोहळ्याच्या निमित्ताने यावर्षी काही विशेष उपक्रमही राबविण्यात येणार आहेत. १३ एप्रिल रोजी सायंकाळी ड्रोनच्या माध्यमातून डॉ. आंबेडकरांच्या जीवनावर आधारित भव्य ड्रोन शो चैत्यभूमी परिसरात सादर करण्यात येणार आहे.

या बैठकीत पोलीस पथक मानवंदना, चैत्यभूमीवर हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी, शिवाजी महाराज मैदानावरील भव्य निवास मंडप, तेथील आपत्कालीन व्यवस्थेसह, आरोग्य सुविधा, प्रदर्शन मंडप, चैत्यभूमी स्तूप व परिसराची सजावट, लोकराज्य मासिकाचा विशेषांक, शासकीय जाहिरात व प्रसिध्दी याबाबत चर्चा झाली व याबाबत निर्देश देण्यात आले.

बैठकीत मुंबई महापालिकेच्यावतीने नियोजनाची सविस्तर माहिती सादरीकरणातून देण्यात आली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पोस्टरचे विमोचन करण्यात आले.

## संपादकीय....

### भारताची रास्त मागणी

पश्चिम आशियात सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर इराणच्या नियंत्रणात गेलेली होर्मुजची सामुद्र धुनी पुन्हा खुली करण्याची भारताने मागणी केली आहे. परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी ब्रिटनच्या पुढाकाराने आयोजित बहुपक्षीय बैठकीत ही भूमिका मांडली. या संघर्षात जलमार्गावर आपले नागरिक गमावणारा भारत हा एकमेव देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ब्रिटनने आयोजित केलेल्या या आभासी बैठकीत ६० हून अधिक देश सहभागी झाले होते. बैठकीचा मुख्य उद्देश होर्मुज सामुद्रधुनीत सुरक्षित आणि निर्बाध जहाजवाहतूक सुनिश्चित करणे हा होता. या संकटामुळे जागतिक तेलाच्या किमतीत मोठी वाढ होत आहे. परराष्ट्र मंत्रालयाच्या निवेदनानुसार, मिस्री यांनी आंतरराष्ट्रीय जलमार्गांमध्ये मुक्त नौवहनाच्या तत्त्वावर भर दिला. तसेच या संघर्षाचा भारताच्या ऊर्जा सुरक्षेवर होत असलेला परिणामही त्यांनी अधोरेखित केला.बैठकीत त्यांनी सांगितले की, होर्मुज परिसरातील व्यापारी जहाजांवरील हल्ल्यांमध्ये भारतानेच सर्वाधिक नुकसान सोसले आहे. डायरेक्टोरेट जनरल ऑफ शिपिंगच्या माहितीनुसार, विदेशी ध्वज असलेल्या जहाजांवर कार्यरत किमान तीन भारतीय खलाशांचा मृत्यू झाला असून एक जखमी आहे. काही जहाजे अद्यापही या सामुद्रधुनीत अडकलेली आहेत. मिस्री यांनी इशारा दिला की, या प्रदेशातील अस्थिरतेचा थेट परिणाम भारताच्या ऊर्जा सुरक्षेवर होत आहे. भारत हा जगातील प्रमुख कच्चे तेल आयात करणाऱ्या देशांपैकी एक असल्याने पश्चिम आशियातील परिस्थितीचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर मोठा प्रभाव पडत आहे. या संकटावर तोडगा काढण्यासाठी तणाव कमी करणे आणि सर्व पक्षांमध्ये संवाद व कूटनीती हाच एकमेव मार्ग असल्याचे त्यांनी नमूद केले. भारताने पुन्हा एकदा स्पष्ट केले की व्यापारी जहाजांवरील हल्ले अस्वीकार्य आहेत आणि आंतरराष्ट्रीय जलमार्गांमध्ये मुक्त वाहतूक सुनिश्चित केलीच पाहिजे. आखाती देशांमध्ये सुमारे एक कोटी भारतीय नागरिक वास्तव्यास आहेत. परराष्ट्र मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, सर्व भारतीय नागरिक सुरक्षित असून भारतीय दूतावास त्यांच्या सतत संपर्कात आहेत. आतापर्यंत या संघर्षात ८ भारतीयांचा मृत्यू झाला असून एक जण बेपत्ता आहे.

# महाराष्ट्रातील जीएसटी महसुलात १२.६ टक्क्यांची वाढ; राज्याच्या कर महसुलात विभागाचा दोन-तृतीयांश वाटा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : वित्तीय वर्ष २०२५-२६ दरम्यान महाराष्ट्र राज्य जीएसटी विभागाने उल्लेखनीय महसूल कामगिरी नोंदवली आहे. वस्तू व सेवा कर, मूल्यवर्धित कर आणि व्यवसाय कर यांमधून एकूण २,५१,२५६ कोटी रुपयांचा महसूल प्राप्त झाला असून, मागील वर्षाच्या २,२३,०८७ कोटी रुपयांच्या तुलनेत १२.६ टक्के वाढ झाली आहे.

राज्यांमधील जीएसटी महसूल संकलनात महाराष्ट्राने देशात अव्वल स्थान पटकावले आहे. दुसऱ्या क्रमांकाच्या राज्याच्या तुलनेत येथील महसूल दुपटीपेक्षा अधिक आहे. तसेच, राज्यातील जीएसटी महसूल वित्तीय वर्ष २०२४-२५ च्या तुलनेत १४.६ टक्क्यांनी वाढून १,८६,९९१ कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे.




राज्याच्या मजबूत अर्थव्यवस्थेचे प्रतिबिंब म्हणून जीएसटी महसुलातील ही वाढ देशातील उच्च वाढ दरांपैकी एक असून, ती राष्ट्रीय सरासरीपेक्षा जवळपास दुप्पट आहे. जीएसटी, व्हॅट आणि व्यवसाय कर मिळून महाराष्ट्राच्या राज्याच्या स्वमालकीच्या कर महसुलात (डजढठ) सुमारे ६४ टक्के योगदान देतात, यावरून राज्य जीएसटी विभागाची वित्तीय बळकटीत असलेली महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित होते.

विभागाने सलग चौथ्या वर्षी आपला अर्थसंकल्पीय अंदाज (इए) ओलांडत १००.२ टक्के लक्ष्य साध्य केले आहे. जीएसटी दर संयुक्तिकरणामुळे निर्माण झालेल्या काही अडचणींनंतरही विभागाने सातत्यपूर्ण प्रयत्न आणि सुधारित अनुपालनाच्या जोरावर या आव्हानांवर मात करत १४.६ टक्क्यांची भक्कम वाढ नोंदवली आहे.

जीएसटी व्यवस्थेअंतर्गत झालेली ही मजबूत वाढ दर संयुक्तिकरणानंतर वाढलेल्या देशांतर्गत उपभोगामुळे तसेच कर प्रशासनाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे शक्य झाली आहे.

महाराष्ट्र राज्य जीएसटी विभागाने डेटा-आधारित अभिप्राय यंत्रणा, प्रगत विषणावर आधारित अंमलबजावणी, उच्च जोखमीच्या करदात्यांवर अधिक लक्ष, तसेच प्रामाणिक करदात्यांसोबत सातत्यपूर्ण संवाद यांसारख्या विविध सुधारणा उपाययोजना राबवल्या आहेत. यासोबतच, 'ईज ऑफ डुईंग बिझनेस' सुधारण्यावरही विभागाचा सातत्याने भर असल्याची माहिती विभागामार्फत देण्यात आली आहे.

# पारधेवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव सारणीकर : औसा तालुक्यातील पारधेवाडी: येथे वारकरी संप्रदायाच्या भक्ती परंपरेत अत्यंत महत्त्वाचे मानला जाणारा अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सह रामकथा आयोजीत करण्यात आली होती ,पारधेवाडी येथे राम नवमी ते हनुमान जयंती सात दिवसांच्या कालावधीत यशस्वीपणे संपन्न झाला. शेवटच्या दिवशी ह.भ.प. रामायनाचार्य गहनिनाथ महाराज गोमदे यांच्या भक्तीपुर्ण काल्याच्या कीर्तनाने या धार्मिक सोहळ्याचा दिमाखदार समारोप झाला,

**ह.भ.प. गहनिनाथ महाराज गोमदे यांच्या काल्याच्या कीर्तनाने व महाप्रसादाने सप्ताहाची सांगता**

पारधेवाडी येथील अखंड हरिनाम सप्ताह वारकरी संप्रदायातील सामूहिक उपासना पद्धतीचा एक भाग आहे, ज्यात सात दिवस संत ज्ञानेश्वरांपासून संत तुकारामांपर्यंतच्या अभंगांवर तत्वचिंतन आणि हरिनाम जप केला जातो. पारधेवाडीतील हा सोहळा स्थानिक पातळीवर आयोजित असून, सप्ताहात सकाळी काकडा आरतीपासून सुरू होऊन ग्रंथपालखी मिरवणूक आणि महाप्रसाद वाटपापर्यंत पोहोचला. या सप्ताहात महाराष्ट्रभरातील नामवंत कीर्तनकारांनी सहभाग घेतला, ज्यामुळे भाविकांमध्ये ईश्वरनामाचे महत्त्व अधोरेखित झाले.

पारधेवाडी येथील भुमीपुत्र बालाजी साखरे यांनी यावेळी गावातली लेक मातासाठी येणाऱ्या पुढच्या वर्षी सप्ताहाच्या निमित्ताने भेट वस्तू देण्याचे घोषित केले. तसेच सर्वांनी हनुमान चालीसा पाठांतर करावे यासाठी बालाजी साखरे यांनी पारधेवाडी ग्रामस्थांना हनुमान चालीसा पुस्तक देणार असल्याचे यावेळी सांगितले.

पारधेवाडी येथील अखंड हरिनाम सप्ताहाला गावातील ३ व्या वर्षी साजरा झाला असून, यंदा मोठ्या उत्साहात पार पडला. ह.भ.प. गहनिनाथ महाराज गोमदे यांचे काल्याचे कीर्तन ऐकून भाविकांच्या मनाला भक्तीचा स्पर्श झाल्याने काल्याच्या कीर्तनात भगवान श्रीकृष्णांच्या लीलांचे वर्णन करत दही-लाह्यांचा प्रसाद वाटप करण्यात आला, यावेळी ग्रंथ शोभा यात्रेत पुरुष ,महिला भाविकांनी फुगड्या खेळत आनंदोत्सव साजरा केला.

या सोहळ्याचे कारण म्हणजे वारकरी परंपरेत हरिनामाच्या अखंड जपाद्वारे मनुष्य जन्माचे ईश्वरनामाशी नाते जोडणे. पारधेवाडीसारख्या ग्रामीण भागात असे कार्यक्रम गावकऱ्यांना धार्मिक एकतेचा अनुभव देतात आणि सामाजिक सुसंवाद वाढवतात.

या सप्ताहाचा परिणाम म्हणजे शेकडो भाविकांचा सहभाग आणि गावात सकारात्मक अखंड हरिनाम सप्ताह महाराष्ट्राच्या धार्मिक वारशाचे प्रतीक आहे, ज्यामुळे भाविकांना आध्यात्मिक ऊर्जा मिळते.

अशा सोहळ्यांप्रमाणे पारधेवाडीतील हा सप्ताह यशस्वी झाल्याने स्थानिक वारकरी संप्रदायात समाधान व्यक्त केले जात आहे.

यावेळी सरपंच हणमंत जाधव, मा. सरपंच गणपती कानडे, महंत सागरनाथ महाराज, जयहिंद शिंदे, बस्वराज साखरे, तंटामुक्ती अध्यक्ष विश्वास साखरे, मच्छिंद्र महाराज साखरे, अरुण कवे, जनक भडके, दयानंद तांबोळकर, धोंडिराम कवे, बंकट कवे, शेखराव कवे, विवेकानंद साखरे, प्रशांत जाधव, राम साखरे, गोरक पवार, विक्रम कवे, राजेंद्र साखरे, शिवाजी पवार, हणमंत जाधव, अभिमन्यु कवे, महेश जाधव, सौ सुवर्णा कवे, जयाबाई शिंदे, मिनाबाई शिंदे, महानंदा भडके, सुंदरबाई गायकवाड, तसेच गावातील लहान थोर भविक भक्त व पारधेवाडी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भगवंताला आपलसं करण्यासाठी परमभक्तीची गरज



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : भगवंताला आपलसं करण्यासाठी परमभक्ती करावी लागते यामुळे भगवंताशी एकरूप झाल्याने भक्त पूर्णपणे देवात विलीन होतो. हीच अद्वेत अनुभूती आहे. या परमभक्तीमुळे अहंकार नष्ट होतो असे विचार ह. भ.प. ज्ञानसिंधू संदीपान महाराज हसेंगावकर यांनी कळंब येथील कसबा पेठ भागातील दक्षिणमुखी हनुमान मंदिर येथे हनुमान जयंती निमित्त सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता प्रसंगी (२ एप्रिल)रोजी काल्याचे किर्तन सेवा प्रसंगी किर्तन सेवेसाठी घेतलेल्या ज्ञानेश्वरीतील संत ज्ञानेश्वर माऊली यांचा अभंग- गवळण आपुलेनि भारे श्रीरंग डोलत गेले अवचिते पाचारिले पाठिमोरेयावर स्पष्टीकरण करताना व्यक्त केले.

**ह.भ.प. ज्ञानसिंधू गुरुवर्य संदीपान महाराज हसेगांवकर यांचे प्रतिपादन**

भगवंताचे महत्त्व स्पष्ट केले. जगात सत्ता ,पैसा याने शासन, प्रशासन ,समाज सुधारू शकत नाही. ही ताकत फक्त वारकरी संप्रदायामध्ये आहे वारकरी संप्रदाय विश्व संप्रदाय बनावा , बुवाबाजी, ढोंगीपणा यावर वारकरी सांप्रदायातील संतांनी कडवट टीका केली आहे, असे प्रतिपादन केले. तसेच त्यांनी संतश्रेष्ठ गोरोबा काका समाधी सोहळ्या निमित्त तेर येथे आयोजित कार्यक्रमात उपस्थित राहण्याचे आवाहन केले.

दुपारी १० ते १२ या वेळेत काल्याच्या किर्तनास भाविकांची मोठी उपस्थिती होती. कळंब येथे २६ मार्च ते २ एप्रिल हनुमान जयंती अखंड हरिनाम सप्ताह संपन्न झाला. २एप्रिल रोजी सूर्योदय समयी हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी भक्तांनी लाडु,पेढे, प्रसाद वाटप केला. त्यानंतर ह.भ.प. ज्ञान सिंधू संदीपान महाराज हासेगांवकर यांचे काल्याचे किर्तन झाले. अखंड हरिनाम सप्ताह निमित्त आचार्य विनोद शास्त्री महाराज वृंदावन निवासी यांनी शिवपुराण कथा, मान्यवर कीर्तनकारांची कीर्तन सेवा, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, आदी कार्यक्रम संपन्न झाले.यावेळी महाप्रसाद पंगत कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती शिवाजी आप्पा कापसे, नगराध्यक्षा सुनंदाताई कापसे यांच्यावतीने देण्यात आली.या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने भाविक भक्त उपस्थित होते.

# कळंबमध्ये घरपोच मतदार मॅपिंगला वेग; अचूक यादीसाठी प्रशासन मैदानात, नागरिकांना सहकार्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कळंब शहरात मतदार यादी शुद्धीकरणाची मोहीम आता प्रत्यक्ष घरापर्यंत पोहोंचली आहे. भाग क्रमांक २४ मध्ये बी.एल.ओ. दत्तात्रय राखुंडे यांनी घरपोच जाऊन मतदार मॅपिंगचे काम हाती घेतले असून या उपक्रमामुळे प्रशासनाने अचूक आणि पारदर्शक निवडणूक प्रक्रियेची तयारी सुरू केल्याचे स्पष्ट झाले आहे.

या मोहिमेत प्रत्येक घराची प्रत्यक्ष पाहणी करून मतदारांची माहिती पडताळली जात आहे. चुकीची नोंद, डुप्लिकेट नावे, स्थलांतरित मतदार किंवा अपूर्ण माहिती अशा त्रुटींवर थेट कारवाई होत असल्याने यादी अधिक विश्वासार्ह बनण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. केवळ कागदोपत्री काम न करता प्रत्यक्ष घरोघरी जाऊन पडताळणी होत असल्याने ही मोहीम प्रशासनाची गंभीरता दर्शवणारी ठरत आहे.

दत्तात्रय राखुंडे हे नागरिकांशी थेट संवाद साधत मतदान प्रक्रियेबाबत जागरूकता निर्माण करत आहेत. विशेष म्हणजे नागरिकांचाही या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद मिळत असून आवश्यक माहिती देत सहकार्य करताना दिसत आहेत.

दरम्यान, प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे की, या घरपोच एस.आय.आर. मॅपिंग मोहिमेमुळे आगामी निवडणुकांसाठी अचूक, पारदर्शक आणि विश्वासार्ह मतदार यादी तयार होणार आहे.

कळंब शहरातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,

आपल्या परिसरातील बी.एल.ओ. मार्फत एस.आय.आर. मॅपिंगचे काम तात्काळ पूर्ण करून घ्यावे, अन्यथा भविष्यात मतदार यादीत त्रुटी राहण्याची शक्यता नाकारता येत नाही, असा इशाराही प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

**दत्तात्रय राखुंडे बी.एल.ओ.हे नागरिकांशी थेट संवाद साधत मतदान प्रक्रियेबाबत जागरूकता निर्माण करत आहेत. विशेष म्हणजे नागरिकांचाही या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद मिळत असून आवश्यक माहिती देत ते सहकार्य करताना दिसत आहेत. या संदर्भात काही अडचण किंवा अधिक माहीती हवी असल्यास ९८ ६० ११ ३६ १६ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन बीएलओ दत्तात्रय राखुंडे यांनी केली आहे.**



# भाजपा पार्कसाईट मंडळ, श्री सेवा प्रतिष्ठान अनिल भाई निर्मळे आयोजित हनुमान जन्मोत्सव सोहळा उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



घाटकोपर/केतन भोज ; भारतीय जनता पार्टी पार्कसाईट मंडळ,श्री सेवा प्रतिष्ठान यांच्या वतीने अनिल भाई निर्मळे ईशान्य मुंबई जिल्हा उपाध्यक्ष यांनी हनुमान जन्मोत्सवाचे आयोजन दिपक सेवा संघ भाजपा कार्यालय,जांभळी नाका ३८७ लास्ट स्टॉप पार्कसाईट विक्रोळी पश्चिम याठिकाणी केले होते.

यावेळी या हनुमान जन्मोत्सव निमित्त सत्यनारायण महापूजा,हनुमान स्तुति,महाआरती तसेच हनुमान जन्म उत्सव व प्रसाद वितरण याशिवाय सुंदरकांड पाठ संगीत भजन,हनुमान चालीसा पाठ अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

श्री सेवा प्रतिष्ठान यांनी आयोजित केलेल्या या हनुमान जन्मोत्सव कार्यक्रमाला विविध राजकीय,सामाजिक स्तरातील मान्यवरांनी उपस्थित राहत दर्शनाचा लाभ घेतला.तसेच विशेष म्हणजे महापौर रितू तावडे, नगरसेवक प्रविण भाई छेडा,मनपा एन विभाग प्रभाग समिती अध्यक्षा अश्विनी मते यांनी देखील या हनुमान जन्मोत्सव कार्यक्रमाला उपस्थित राहत दर्शनाचा लाभ घेतला.यावेळी अनिल भाई निर्मळे आणि संतोष गांजले यांच्या सोबतच भाजपाच्या असंख्य कार्यकर्त्यांनी त्यांचे स्वागत केले.


हा हनुमान जन्मोत्सव कार्यक्रम उत्साहात संपन्न होण्यासाठी संतोष गांजले मंडळ अध्यक्ष पार्कसाईट, महेश गुप्ता वॉर्ड अध्यक्ष,वकिल यादव, संदिप सिंग, शिवम मिश्रा, दत्ता सोनवणे, जय सावंत,शंकर मांडये, उमेश कोठवदे, सौ.बबीता चौव्हाण,सुधीर ढकोलिया,सौ. हेमा,आप्पा पालांडे अशा असंख्य भाजपा महिला-पुरुष पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कठोर परिश्रम घेतले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : सोलापूर जिल्ह्याचे नवनियुक्त जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी आज श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले.

यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीच्या सदस्या शकुंतलाताई नडगिरे व नगराध्यक्षा प्रणिता भालके यांनी जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस यांचा उपरणे व श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची मूर्ती देऊन सत्कार केला.

यावेळी प्रांताधिकारी सचिन इथापे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे, मंदिर समितीचे व्यवस्थापक संदेश भोसले उपस्थित होते.


कार्तिकेयन एस. हे भारतीय प्रशासकीय सेवेतील २०२० बॅच चे (आय. ए. एस.) महाराष्ट्र केडरचे अधिकारी आहेत. ते यापूर्वी कोल्हापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत होते. सोलापूर जिल्हाधिकारी पदाचा पदभार स्वीकारण्यापूर्वी त्यांनी पंढरपूर येथे भेट देऊन श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले.

यावेळी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर संवर्धन व जीर्णोद्धार कामे पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून, सदर कामाची माहिती कार्तिकेयन एस. यांनी घेतली. यावेळी मंदिर समितीचे व्यवस्थापक संदेश भोसले यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात सुरू असलेल्या व करण्यात आलेल्या कामांची माहिती यावेळी दिली.

यावेळी प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी पंढरपूर तालुका प्रशासनाच्या वतीने नवनियुक्त जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.



# कलेमुळे जीवन समृद्ध होते : भारत गदगे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : माणसाच्या दैनंदिन जगण्यात कलेला अत्यंत महत्त्वाचे स्थान असून, कलेमुळे जीवनातील ताणतणाव कमी होतात आणि जीवन अधिक सुंदर व समृद्ध होते, असे प्रतिपादन राज्य पुरस्कारप्राप्त कलाध्यापक भारत गदगे यांनी केले. रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात आयोजित 'कला महोत्सव स्पर्धा २०२६' च्या उद्घाटन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव होते. यावेळी व्यासपीठावर अधिष्ठाता डॉ. समाधान माने, डॉ. बाळासाहेब बळवंत, उपप्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे, डॉ. सुशील शिंदे तसेच स्वायत्त महाविद्यालयाचे समन्वयक प्रा. डॉ. आनंद शिंदे, युवा महोत्सव समिती प्रमुख प्रा. मारुती नायकू आदी मान्यवर उपस्थित होते.

भारत गदगे यांनी विद्यार्थ्यांना कला क्षेत्रातील प्रवास, त्यासाठी लागणारी मेहनत व साधना याबाबत मार्गदर्शन केले. कलेकडे पाहण्याचा दृष्टिकोन आणि कलाकाराची सातत्यपूर्ण साधना यावर त्यांनी विशेष भर दिला. यावेळी त्यांनी आकर्षक पेंटिंगचे प्रात्यक्षिक सादर केले, ज्याला विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांनी कला, क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांचे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात असलेले महत्त्व अधोरेखित केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थी आत्मनिर्भर बनून जीवनात स्वतःच्या पायावर उभे राहतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमात डॉ. समाधान माने यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. रमेश शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. सारिका भांगे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. सागर नाईकनवरे यांनी केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कला महोत्सव समितीतील सदस्य, विविध विभागांचे प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# कोठूर येथे सावरकर विद्यालयात सायकल वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : कोठुरे गावात मराठा विद्या प्रसारक समाजाचे स्वा. सावरकर विद्यालय येथे आजूबाजूच्या परिसरातील व गावातील अनेक विद्यार्थी ज्ञानार्जनासाठी येत असतात, त्यातीलच कोठूरे पासून जवळच असलेले कुरडगाव येथील अनेक विद्यार्थी या शाळेत शिकण्यासाठी येत असतात परंतु परिवहन मंडळाच्या बसची सोय नसल्याने या विद्यार्थ्यांच्या उपस्थितीवर होणारा परिणाम लक्षात घेऊन विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनील सातपुते यांचे संकल्पनेतून विद्यालयात कार्यरत असणाऱ्या सर्व शिक्षकांनी एकत्र येऊन या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात खंड पडू नये म्हणून सायकल देण्याचे ठरवले व त्यानुसार विद्यालयातील स्वाती चिखले, यांनी स्वतःच्या कुटुंबातील दोन सायकली या विद्यार्थ्यांना दिल्या असून. शिक्षकांच्या जमा होणाऱ्या देणगीतून कुरडगावच्या विद्यार्थ्यांसाठी आठ सायकली खरेदी करण्यात आल्या व त्यांचे वितरण शालेय समितीचे सदस्य सुयोग गीते, तुषार मोगल, प्रकाश कोरडे, विष्णू मोगल इत्यादी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना करण्यात आले. यावेळी शालेय समिती सदस्य कुरडगाव चे पालक तसेच विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.




# बादोला (बु.) या ठिकाणी प्रबोधनकार भीम शाहीर अनिरुध्द बनकर यांच्या कार्यक्रमाचे आयोजन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : सोलापूर जिल्ह्यातील बादोला ता.अक्कलकोट या ठिकाणी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त दि.२५ एप्रिल २२६ रोजी सायंकाळी ठिका ७.०० वा.समाज प्रबोधनपर थोर प्रबोधनकार भीम शाहीर अनिरुद्ध बनकर यांच्या भिमगीत गायनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

बादोला ता.अक्कलकोट येथे भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव परम पूज्य बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. येथील सामाजिक कार्यकर्ते तथा स्वकृत्वाने उद्योग जगतात आपला वेगळा ठसा उमटविणारे शून्यातून विश्व निर्माण करणारे उद्योजक दत्ता गायकवाड (बादोला-पूणे ) व भिम क्रांती तरुण मंडळ बादोला यांच्या पुढाकारातून महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने दि.२५ एप्रिल २०२६ रोजी बादोला (बु.) या ठिकाणी आपल्या मधुर वाणीतून पहाडी आवाजातून बुद्ध-फुले-शाहू-आंबेडकरांचे विचार तळागाळात पोहोचविणारे थोर प्रबोधनकार भिम शाहीर अनिरूद्ध बनकर यांच्या भीम गीत गायनाच्या कार्यक्रमाचे आयोजन सायंकाळी ७. वा.करण्यात आले आहे.

**सर्व आंबेडकरी अनुयायाना उपस्थित राहण्याचे आवाहन**

तरी अक्कलकोट तालुकासह सोलापूर जिल्ह्यातील तमाम आंबेडकरवादी अनुयायानी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहकार्य करावे असे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक दत्ता गायकवाड सह भिम क्रांती तरुण मंडळ बादोला यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# नांदगाव तालुका मराठी पत्रकार संघाची नूतन कार्यकारिणी बिनविरोध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/ प्रतिनिधी : नाशिक जिल्हा मराठी पत्रकार संघ (रजि.) संलग्न नांदगाव तालुका मराठी पत्रकार संघाची सन २०२६-२०२७ या एका वर्षासाठीची महत्त्वाची निवडणूक प्रक्रिया नुकतीच संपन्न झाली. संस्थापक अध्यक्ष यशवंतराव पवार यांच्या अध्यक्षतेखाली आणि जिल्हाध्यक्ष अण्णा बोरगुडे यांच्या प्रमुख उपस्थितीत नांदगाव येथील शासकीय विश्रामगृह येथे ही बैठक पार पडली. या बैठकीत एक वर्षासाठी संपूर्ण कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली.

निवडणूक निर्णय अधिकारी विजय बोराडे अधिकृत निकाल जाहीर केला.यामध्ये खालील पदाधिकाऱ्यांची निवड निश्चित करण्यात आली आहे:

नूतन कार्यकारिणी २०२६-२०२७:

आमिन नवाब शेख अध्यक्ष, महेश हरिभाऊ पेवाल कार्याध्यक्ष, बाबासाहेब कारभारी काळे उपाध्यक्ष, विजय सुधाकर भावसार उपाध्यक्ष, चंचल मदनलाल गंगवाल सरचिटणीस, सुहास लक्ष्मणराव पुनतांबेकर सहसरचिटणीस, सतिष रतनसिंग परदेशी खजिनदार, अनिल शामराव शिंदे सहखजिनदार, अजहर शफी शेख संघटक, सचिन अंबादास पांडे सहसंघटक, अनिल महादू आव्हाड समन्वयक, सचिन पुंजाराम गायकवाड कार्यकारिणी सदस्य, दिगंबर पोपट सोनवणे कार्यकारिणी सदस्य, मोहम्मद नवाब शेख कार्यकारिणी सदस्य, संतोष रामचंद्र खताळ कार्यकारिणी सदस्य

या निवडीनंतर उपस्थित मान्यवरांनी नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. पत्रकार संघाच्या माध्यमातून पत्रकारांचे प्रश्न सोडवण्यासाठी आणि सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी ही कार्यकारिणी तत्पर राहील, असा विश्वास नूतन अध्यक्षांनी यावेळी व्यक्त केला. या निवडीबद्दल संपूर्ण तालुक्यातून नूतन पदाधिकाऱ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.यावेळी प्रमुख अतिथी म्हणून जेष्ठ पत्रकार बब्बूभाई शेख माजी अध्यक्ष संजय मोरे विजय चोपडा अनिल धामणे यांच्यासह इतर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी आगामी जिल्हा पत्रकार संघाचा पत्रकार दिनाचा कार्यक्रम नस्तनपूर येथे घेण्याची घोषणा करण्यात आली.



**सुनांना माहेरचा दाखला आवश्यक**

**अफवांना बळी न पडण्याचे आवाहन**

# मतदार यादी सखोल पुनरिक्षणासाठी गृहभेटी सुरू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड /प्रतिनिधी : मा. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार लवकरच मतदार यादीचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम जाहीर होणार असून त्याअनुषंगाने पूर्वतयारीला वेग आला आहे. या प्रक्रियेत सन २०२४ च्या मतदार यादीतील मतदारांची नावे सन २००२ च्या मतदार यादीशी मॅप करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. ज्या मतदारांची नावे २००२ च्या यादीत आढळत नाहीत, त्यांच्या आई-वडील किंवा आजी-आजोबा यांच्या नावाशी मॅपिंग करण्यात येणार आहे.

संबंधित माहिती उपलब्ध नसल्यास मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) मतदारांच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन माहिती संकलित करणार आहेत. या गृहभेटीदरम्यान मतदारांच्या मूळ रहिवासाचे राज्य, जिल्हा, तालुका व गाव याबाबत तपशील घेतला जाणार आहे. विशेषतः लग्नानंतर इतरत्र राहायला आलेल्या महिलांच्या बाबतीत त्यांच्या माहेरच्या कुटुंबाची सन २००२ मधील मतदार यादीतील नोंद कोणत्या मतदारसंघात होती, याची माहिती घेतली जाणार आहे. त्यामुळे सुनांनी आपले नाव मतदार यादीत टिकवण्यासाठी माहेरचा दाखला तसेच आई-वडिलांची माहिती तयार ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



या प्रक्रियेसाठी ीिंशीी.शलळ.सीं.ळप या संकेतस्थळावर किंवा एउख छएढ ॲपच्या माध्यमातून सन २००२ मधील नाव शोधून मॅपिंग केले जाणार आहे. ज्या मतदारांचे नाव २००२ च्या यादीत सापडत नाही किंवा आवश्यक पुरावे सादर करता येत नाहीत, त्यांच्या नावाबाबत पुढील पडताळणी केली जाणार असून कोणत्याही मतदाराचे नाव संबंधितांशी संपर्क साधल्याशिवाय मतदार यादीतून कमी केले जाणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

दरम्यान, ही प्रक्रिया ३१ मार्च २०२६ पर्यंतच सुरू राहणार असल्याच्या अफवा पसरत असल्याने नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. मात्र विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर ही प्रक्रिया मार्च २०२६ नंतरही सुरू राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांनी अफवांना बळी न पडता प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, मतदार मॅपिंगचे सुमारे ६२ टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित कामासाठी बीएलओना जबाबदारी देण्यात आली आहे. नागरिकांना माहिती देण्यासाठी क्यूआर कोडची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. नागरिकांनी हा कोड स्कॅन करून सन २००२ मधील आपले नाव तपासावे.

सुनांच्या बाबतीत आई-वडिलांचे पूर्ण नाव, जन्मतारीख, मूळ गाव, तालुका व जिल्हा, संबंधित विधानसभा मतदारसंघ तसेच मतदार यादीतील क्रमांक यासह तपशील द्यावा लागणार आहे. याशिवाय आवश्यकतेनुसार २००२ पूर्वीची मतदार यादी, जन्म दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, विवाह नोंदणी प्रमाणपत्र, आधार कार्ड, रेशन कार्ड, बँक पासबुक, शासकीय ओळखपत्र आदी कागदपत्रांची मागणी केली जाऊ शकते.

विशेष सखोल पुनरिक्षणाच्या पूर्वतयारीचा भाग म्हणून १२१-निफाड विधानसभा मतदारसंघातील मतदारांच्या घरी बीएलओ अधिकारी भेट देणार असून सर्व सुजाण मतदारांनी आवश्यक माहिती उपलब्ध करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन प्रांतधिकारी डॉ. शशिकांत मंगरुळे यांनी केले आहे.

# माळशिरस येथील तरुणीचा खानवडी येथे खून; आरोपीस अटक



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड : खानवडी (ता. पुरंदर) येथील हद्दीत बुधवारी (दि.१) रात्री साडेनऊच्या सुमारास घडलेल्या धक्कादायक घटनेत २२ वर्षीय तरुणीचा खून करण्यात आला. या प्रकरणी सासवड पोलिसांनी संशयित आरोपीला अटक केली आहे.

नीलम महेंद्र गायकवाड (वय २२, रा. माळशिरस, ता. पुरंदर) असे मृत तरुणीचे नाव असून, अनिकेत विष्णू जाधव (वय २१, रा. माळशिरस) यास अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत नीलम ही सासवड येथील वाघिरे महाविद्यालयात टीवायबीएचे शिक्षण घेत होती. १ एप्रिल रोजी सकाळी नीलम नेहमीप्रमाणे महाविद्यालयात गेली होती. सायंकाळपर्यंत ती घरी परतली नाही. कुटुंबीयांनी तिच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, संपर्क होऊ शकला नाही. रात्री उशिरा पोलिसांकडून माहिती मिळाल्यानंतर कुटुंबीय सासवड येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल झाले असता, नीलमचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. घटनेप्रकरणी नीलमचे वडील महेंद्र प्रल्हाद गायकवाड (वय ५०) यांनी सासवड पोलिस ठाण्यात दिली आहे. त्यावरून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेनंतर सासवड पोलिसांनी वेगाने तपास करीत आरोपी जाधव यास अटक केली. तपास उपविभागीय पोलिस अधिकारी राजेंद्रसिंह गौर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# पडघ्यात महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंतीचे आयोजन

## २५ गावांचा सहभाग; प्रबोधन सत्र, भव्य मिरवणूक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/ मिलिंद जाधव : पडघा परिसरात क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती महोत्सव पडघे विभागाच्या वतीने मंगळवार, दिनांक १४ एप्रिल २०२६ रोजी महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती सोहळा मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन पडघा येथील जिल्हा परिषद मराठी केंद्र शाळेत करण्यात आले असून सकाळी १०.३० वाजता उद्घाटन सोहळा पार पडणार आहे. उद्घाटनानंतर बुद्ध वंदना तसेच




मान्यवरांचे स्वागत व सत्कार समारंभ होईल .तर यंदाच्या जयंती महोत्सवात प्रबोधनाला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. प्रबोधन सत्रात प्रसिद्ध शाहीर आकाश पवार हे आम्ही भारताचे लोक आणि भारतीय संविधान या विषयावर मार्गदर्शन करणार असून उपस्थितांना संविधानाविषयी जागरूक करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. सायंकाळी ६ वाजता समतानगर बुद्ध विहार येथून जिल्हा परिषद मराठी शाळा, पडघा पर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.या मिरवणुकीत क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा विद्युत दिव्याची रोषणाई आणि फुलांनी सजविलेल्या रथावर विराजमान करून जयघोषाच्या वातावरणात जयंती साजरी होणार आहे. या संयुक्त जयंती उत्सवासाठी पडघा परिसरातील तब्बल २५ गावे एकत्र येत असून सामाजिक ऐक्य व महापुरुषांच्या विचारांचा प्रसार करण्याचा उद्देश आयोजकांनी व्यक्त केला आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती महोत्सव पडघे विभागातील आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# पावसाचे पाणी वाहून नेणाऱ्या ब्रिटीशकालिन पर्जन्य जलवाहिन्यांचे ५० वर्षांनी वाढणार आयुष्य

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: मुंबई महानगरपालिकेकडून मुंबई शहर विभागातील १०० वर्षे जुन्या भूमिगत कमानी पर्जन्य जलवाहिन्यांचे जिओपॉलिमर अस्तराचे खंडकविरहित तंत्रज्ञानाद्वारे मजबुतीकरण करण्यात येत आहे. यामुळे ब्रिटिशकालीन असलेल्या या कमानी पर्जन्य जलवाहिन्यांचे आयुष्य किमान ५० वर्षांनी वाढणार आहे. तसेच पाण्याचा प्रवाहाचा वेग वाढण्यासह अतिवृष्टीदरम्यान पावसाच्या पाण्याचा निचरा अतिवेगाने होण्यास मदत मिळणार आहे. तसेच यांची सुधारणा होत असल्यामुळे त्यातील गळती रस्ता खचण्याच्या होणाऱ्या घटनांचे प्रमाण कमी होणार आहे.

या अस्तरिकरण कामाची उप आयुक्त (पायाभूत सुविधा) गिरीश निकम, प्रमुख अभियंता (पर्जन्य जलवाहिन्या) कल्पना राऊळ, उप प्रमुख अभियंता सुनीलदत्त रसाळ, कार्यकारी अभियंता मिलिंद व्हटकर, प्रशांत रणसुरे, मधुसूदन सोनवणे आदिंनी शामलदास गांधी मार्ग (प्रिन्सेस स्ट्रीट) उड्डाणपुलाजवळील शांतिनिकेतन पर्जन्य जल पातमुख (आऊटफॉल) जवळ पाहणी केली.

मुंबईच्या पश्चिमेस अरबी समुद्र आहे आणि मुंबईत खाडी परिसर आहे. कमानी तथा बंदीस्त पर्जन्य जलवाहिन्या प्रणालीमधून पावसाचे पाणी समुद्रात सोडण्याच्या दृष्टीकोनातून भरती-ओहोटी महत्त्वाचा भाग आहे. शहर विभागात ४९५ किलोमीटर लांबीच्या पर्जन्य जलवाहिन्या आहेत. तसेच पूर्व उपनगरांत आणि पश्चिम उपनगरांत प्रत्येकी ६३ किलोमीटर, असे एकूण ६२१ किलोमीटर लांबीच्या कमानी तथा बंदिस्त पर्जन्य जलवाहिन्या आहेत.

जुन्या झालेल्या कमानी पर्जन्य जलवाहिन्यांच्या काही भागांमध्ये अनेक भेगा, विटांचे विस्थापन, दोन विटांमधील सांध्यांचे नुकसान, छताचा भाग कोसळणे यासह काही इतर दोष हे प्रचलन व परिरक्षण विभागाद्वारे करण्यात आलेल्या सीसीटीव्ही सर्वेक्षणात आढळून आले होते. त्यात २३ हजार ५४८ मीटर लांबीच्या ५६ कमानी पर्जन्य जलवाहिन्या दोष अवस्थेत आढळल्या. यापैकी १४ हजार २८५ मीटर लांबीच्या २७ कमानी पर्जन्य जलवाहिन्या (टप्पा क्रमांक १ मध्ये) तातडीने पुनर्वसन करण्याची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले.

महानगरपालिकेच्या प्रचलन व परिरक्षण विभागाद्वारे याबाबत भारतीय तंत्रज्ञान संस्था (मुंबई) (आय. आय. टी. मुंबई) आणि वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था (व्ही. जे. टी. आय.) या दोन्ही संस्थांशी चर्चा करून जुन्या कमानी पर्जन्य जलवाहिन्यांच्या पुनर्वसनासाठी सर्वोत्तम तंत्रज्ञान सुचविण्याबाबत चर्चा करण्यात आली.

या दोन्ही संस्थांचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर तांत्रिक सल्लागार समितीची नोव्हेंबर २०२२ मध्ये बैठक घेण्यात आली होती. समितीच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे सध्या उपलब्ध असलेल्या सर्व तंत्रज्ञानामध्ये कमानी पर्जन्य जलवाहिन्यांच्या पुनर्वसनासाठी जिओपॉलिमर अस्तर खंदकरहित तंत्रज्ञानाद्वारे डागडुजी करण्यात येत आहे.

पर्जन्य जलवाहिनी विभागाने टप्पा १ मध्ये शहर परिसरातील कमानी जलवाहिन्यांचे जिओपॉलिमर अस्तरीकरण खंदकरहित तंत्रज्ञानाद्वारे सुरू करण्यात आले आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून वापरण्यात येत असलेले जिओपॉलिमर अस्तर खंदकविरहीत तंत्रज्ञान हे भारतामध्ये प्रथमच वापरण्यात येत आहे. अशा प्रकारची कामे इतर देशांमध्ये मुख्यतः अमेरिकेत केली जातात.

# धर्मवीर संभाजी मित्र मंडळाच्या वतीने हनुमान जन्मोत्सव सोहळा उत्साहात संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : धर्मवीर संभाजी मित्र मंडळ(रजि.) संचालित हनुमान जन्मोत्सव समितीच्या वतीने हनुमान जन्मोत्सवाचे हनुमान मंदिर,धर्मवीर संभाजी चौक, चिरागनगर,घाटकोपर(प) या ठिकाणी बुधवार १ एप्रिल ते २ एप्रिल या दिवशी हनुमान जन्मोत्सव आयोजन करण्यात आले होते.या वर्षी मंडळाचे ५७ वे वर्ष होते.दोन दिवसीय चालणार्या हनुमान जन्मोत्सव सोहळ्यात लहान मुलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.तसेच श्री कालभैरवनाथ प्रासादिक भजन मंडळाचा भजनाचा कार्यक्रम मोठ्या हर्ष उल्हासात संपन्न झाला. गायनाचार्य व घाटकोपर भूषण ह.भ.प तानाजी महाराज तांबारे,अशोक महाराज पाचपिल्ले,श्याम महाराज दिघे,मिलिंद काळे,संभाजी पवार, बन्सी ढेरे,बाबू तांबुटकर यांची मोलाची साथ लाभली.या महाप्रसादासाठी विभागीय महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. धर्मवीर संभाजी मित्र मंडळ हे सांस्कृतिक, सामाजिक शैक्षणिक, कला, क्रिडा मध्ये नेहमीच सक्रिय असते.

# भाजपाचा महाराष्ट्रातील पहिला उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक यामध्ये भाजपा प्रदेश कार्यकारी सदस्य शहाजी पवार भाजप नेते अविनाश जी महागावकर जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा सभापती अर्थ व बांधकाम इंद्रजीत पवार यांच्या पुढाकारांनी भाजपची मूळ संकल्पना त्यांच्या शक्तीने कोणती निवडणूक जिंकू शकतो ती म्हणजे बूथ मजबुतीकरण या उद्देशाने विविध परिषद मतदार संघातील एकूण ३२ बूथ मध्ये स्पर्धा लावण्यात आली होती व त्या स्पर्धेचे स्वरूप ज्यामध्ये एकूण मतदानापैकी ७० टक्के मतदान होईल त्या बोट साठी होत झालेल्या मतदानापैकी भाजप उमेदवार ६०%



पेक्षा जास्त होईल अशा मतदान झालेल्या सर्व भूतनाथ प्रोत्साहन म्हणून रोख स्वरूपात बक्षीस देण्यात आले त्यामध्ये कारंबा गावातील २८४ २८५ या बोत मध्ये भाजप उमेदवारास ६०% पेक्षा जास्त मते मिळाली त्यामुळे कारंबा गावातील बूथ प्रमुख व शक्ति केंद्रप्रमुख यांना रोग पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. या उपक्रमामुळे पक्षाला झालेला फायदा विचारात घेता हा उपक्रम मोठ्या प्रमाणात राबवण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. संबंधित जिल्हा परिषद गटातील कारंबा हे गाव बक्षीसांसाठी पात्र ठरले यावेळी लोकप्रतिनिधी इंद्रजीत पवार पृथ्वीराज भैय्या यांनी चैतलीताई मुळे तेजस्विनी बोराडे सुनील भोसले सुनिता अरुण बारस्कर तसेच मंडल अध्यक्ष संभाजी दडे व भाजपा ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष विनायक सुतार सेलचे अध्यक्ष पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

त्यावेळेस सरपंच तुकाराम चव्हाण माजी सरपंच दत्तात्रय पवार बाळासाहेब माने महादेव जाधव विनोद भांडवले सत्तार भाई शेख अमोल सुतार अलाउद्दीन शेख अतुल रोकडे मोहीम शेख संजय आधाटे माशाचे इत्यादी भाजप कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# के. बी. पी. महाविद्यालयातील सरस्वती कौलगे हिची आंतर विद्यापीठ खो-खो स्पर्धेसाठी निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर येथील विद्यार्थिनी सरस्वती कौलगे हिची आंतर विद्यापीठ (राष्ट्रीय ) खो-खो स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ही स्पर्धा मध्य प्रदेश राज्यातील रेवा येथे आयोजित करण्यात येणार असून, तिच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील गुणवत्तेला पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

सरस्वती कौलगे हिने आपल्या सातत्यपूर्ण सराव, चिकाटी व उत्कृष्ट खेळाच्या जोरावर ही निवड मिळवली असून, तिच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालयातर्फे तिचा विशेष सत्कार करण्यात आला. या प्रसंगी प्राचार्य डॉ. बी.टी.जाधव यांनी विद्यार्थिनीचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या व तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

यावेळी महाविद्यालयातील सर्व विभागाचे उपप्राचार्य सर्व विभाग प्रमुख व जिमखाना विभागातील प्रा. विठ्ठल फुले, प्रा.मनोज खपाले,प्रा. अनिल परमार, तसेच जिमखाना कमिटी सदस्य डॉ. भारती सुडके उपस्थित होते.

महाविद्यालयाच्या वतीने सरस्वती कौलगे हिच्या यशाबद्दल आनंद व्यक्त करण्यात येत असून, आगामी स्पर्धेत ती उल्लेखनीय कामगिरी करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

# ईटकूर येथे शेकडो भाविकांच्या उपस्थितीत विठ्ठल बिरुदेव यात्रा पडली पार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधी/ सुधाकर रणदिवे : तालुक्यातील ईटकूर येथे बर्याच वर्षांपासून सुरू असलेल्या यात्रेत या वर्षी भावीक भक्तांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केल्याचे पहावयास मिळाले.



यावेळी शेकडो भाविकांच्या उपस्थितीत पूजारी यांच्या घरापासून मारुती मंदिराला प्रदक्षिणा घालत मंदिरा पर्यंत परज काढली जाते.मोठ्या प्रमाणात भंडाऱ्याची उधळन केली जाते.

या दिवशी परीसरात दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. सर्व कार्यक्रम झाल्यानंतर ग्रामस्थांच्या वतीने सर्वांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येते.

हा कार्यक्रम व्यवस्थित पार पाडण्यासाठी ईटकूर येथील सर्व गावकऱ्यांनी परीश्रम घेतले..

## पंढरपूर येथे फार्माटेक २०२६ परिषदेचे आयोजन

# कर्मयोगी मध्येफार्माटेक २०२६ तंत्र परिषदेमध्ये अनेक समाजाभिमुख प्रकल्पाचे सादरीकरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : विद्यार्थ्यांनी अभियांत्रिकीचे ज्ञान व संकल्पना यांचा वापर करून आई जगाकडे वळले पाहिजे भावी अभियंते हे नोकरी करणारे न राहता नोकरी देणारे अभियंते तयार व्हावेत यासाठी फर्माटिक सारख्या स्पर्धेमधून अनेक नवीन शोध जन्माला येतील. अनेक व्यवसाय तयार होतील असा विश्वास छत्रपती संभाजीनगर येथील यशस्वी उद्योजक डॉक्टर मनोज कदम यांनी व्यक्त केले.

श्री पांडुरंग प्रतिष्ठान संचालित कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी पंढरपूर येथे दिनांक २ एप्रिल २०२६ रोजी आयोजित केलेल्या फार्माटिक २०२६ या परिषदेमध्ये ते बोलत होते कर्मयोगी पॉलिटेक्निक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर अजित कणसे या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी होते.




प्राचार्य डॉक्टर एस पी पाटील यांनी उपस्थित यांचे स्वागत केले विद्यार्थ्यांनी अभियांत्रिकीचे कौशल्य व कल्पकता यावर लक्ष केंद्रित करून समाजभिमुख प्रकल्प करावेत असा मोलाचा संदेश त्यांनी यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना देऊन महाविद्यालयाचे ओळख करून दिली.

फार्मट्रेक २०२६ तंत्र परिषदेचे समन्वयक डॉक्टर एस व्ही एकलारकर यांनी प्रमुख अतिथी डॉक्टर मनोज कदम यांची ओळख करून देऊन स्पर्धेमधील सहभागी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

सदरच्या परिषदेमध्ये अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रोजेक्ट, प्रदर्शन, सर्किट कोड कोर्सेस ब्रिज मॉडेल मेकिंग ग्रीन वेल्डिंग अशा विविध राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते या स्पर्धेसाठी राज्यातील सुमारे ८५० अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता प्रत्येक स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना आकर्षक बक्षिसे प्रदान करण्यात आली.

या कार्यक्रमासाठी श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक यांनी कार्यक्रमात शुभेच्छा दिल्या यावेळी रजिस्टर जी डी वाळके कर्मवीर शिक्षण समूहातील विविध महाविद्यालयाचे प्राचार्य शैक्षणिक अधिष्ठाता प्राध्यापक राहुल पांचाळ माजी विद्यार्थी यशस्वी उद्योजक वैभव पाटील, योग विद्या विभागाचे प्राचार्य अशोक ननवरे उपस्थित होते फार्माटिक २०२६ संयोजक डॉ. अभय उपास समन्वयक डॉक्टर एस व्ही एकलारकर विभाग प्रमुख डॉक्टर एस एम लंबे प्राध्यापक अनिल बाबर प्राध्यापक दीपक भोसले तसेच सर्व प्राध्यापक व सर्व वर्ग यांचे कार्यक्रम कार्यक्रम यशस्वी करण्यामागे मोलाचे सहकार्य लाभले. उपप्राचार्य जेल मुडेगावकर यांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता झाली.

# खसखस लागवडीसाठी परवानगी द्यावी; शेतकरी बब्रुवान गोरे यांची शासनाकडे मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



कळंब/प्रतिनिधी : राज्यातील वाढता शेती खर्च, घटते उत्पादन आणि बाजारातील अस्थिर भाव यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असून पर्यायी उत्पन्नाचा मार्ग उपलब्ध करून देण्याची गरज निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर मस्सा (खं) ता कळंब जि. धाराशिव येथील शेतकरी कार्यकर्ते बब्रुवान नरसिंग गोरे यांनी राज्य शासनाकडे दि.२ एप्रिल २०२६ रोजी कृषी मंत्री मा. ना. श्री. दत्तात्रय भरणे यांना निवेदन देत मागणी करण्यात आली आहे. देण्यात आलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की,शेतकऱ्यांना त्यांच्या स्वतःच्या शेतामध्ये किमान एक हेक्टर क्षेत्रावर खसखस पिक लागवडीसाठी कायदेशीर परवानगी देण्यात यावी. तसेच या पिकाचे उत्पादन शासनाने खरेदी करून शेतकऱ्यांना आर्थिक आधार द्यावा, अशीही विनंती करण्यात आली आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, सध्या शेती व्यवसाय निसर्गावर पूर्णपणे अवलंबून असून दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट यांसारख्या संकटांमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. उत्पादन कमी आणि खर्च जास्त असल्याने शेती तोट्यात जात आहे. अनेक वेळा पिकांना योग्य बाजारभावही मिळत नसल्याने शेतकऱ्यांची परिस्थिती अधिक बिकट होत आहे.

यामुळे शेतकरी कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे कठीण झाले असून मुलांच्या शिक्षणासाठीही खर्च करणे अवघड बनले आहे. या परिस्थितीत अनेक शेतकरी मानसिक तणावाखाली जाऊन टोकाचे निर्णय घेत असल्याचीही खंत गोरे यांनी व्यक्त केली आहे.

शासनाने योग्य तो कायदा करून खसखस लागवडीला परवानगी दिल्यास शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यास मदत होईल व आत्महत्यांचे प्रमाण कमी होण्यास हातभार लागेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. निवेदनावर लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घेण्याची मागणीही बब्रुवान गोरे यांनी दिलेल्या निवेदनात केली आहे.